# वसई विरार शहर महानगरपालिका

ई–वार्ता
माहे जानेवारी 2016



## प्रजासत्ताक दिन सोहळा

दि. 26 जानेवारी 2016 रोजी सकाळी ठिक 8.00 वाजता वसई–विरार शहर महानगरपालिकेच्या मैदानात प्रजासत्ताक दिन हा माननीय प्रथम महिला महापौर प्रविणाताई हितेंद्र ठाकुर यांच्या हस्ते पार पाडण्यात आला. या कार्यक्रमासाठी आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच या दिनानिमित्त महानगरपालिकेची दैनंदीनी (डायरी) आमदार श्री.हितेंद ठाकुर, श्री. क्षितीज ठाकुर तसेच महानगरपालिकेचे महापौर सौ. प्रविणाताई ठाकुर, व माननीय आयुक्त श्री. सतीश लोखंडे (भा.प्र.से) आदी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली.





# वसई विरार शहर महानगरपालिका

ई–वार्ता
माहे जानेवारी 2016

## प्रजासत्ताक दिनानिमित्त महानगरपालिकेचे नविन संकेतस्थळाचे लोकार्पण

दि. 26 जानेवारी 2016 रोजी ध्वजवंदन कार्यक्रमानंतर vvcmc.in हे महानगरपालिकेचे नवीन अध्यावत संकेतस्थळ प्रसिध्द करण्यात आले असून सदर प्रसंगी मा. आमदार श्री. हितेंदजी ठाकुर, श्री. क्षितीज हितेंद्र ठाकुर, प्रथम महापौर श्री. राजीवजी पाटील तसेच महापौर सौ. प्रविणाताई हितेंद्र ठाकुर, व माननीय आयुक्त श्री. सतीश लोखंडे (भा.प्र.से), उपआयुक्त श्री. अजीज शेख, डॉ. किशोर गवस उपआयुक्त आदी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.










# वसई विरार शहर महानगरपालिका

ई–वार्ता
माहे जानेवारी 2016

## २३ जानेवारी २०१६ साजरी करण्यात आली नेताजी सुभाषचंद्र बोस यांची 119 वी जयंती









दि. 23/01/2016 रोजी सकाळी 10.00 वा महानगरपालिकेच्या मुख्यालयात सुभाषचंद्र बोस जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सदर प्रसंगी महानगरपालिकेचे सहा. आयुक्त नोडल ऑफिसर तथा श्री. सदानंद सुर्वे (आस्थापना) मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. महादेव पालव, यांच्या सह कर्मचारी वर्ग, श्री. सुकदेव दरवेशी सहा. आयुक्त, (आरोग्य विभाग), सौ. निलम निजाई, श्री. राजेश घरत (प्र. सहा. आयुक्त), श्री. राजेंद्र पाटील (प्र. सहा. आयुक्त) उपस्थित होते. नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती निमित्याने श्री. महादेव पालव यांनी स्वातंत्र लढयातील नेताजींच्या योगदानाचा आढावा उपस्थित करुन दिला.

# वसई विरार शहर महानगरपालिका

ई–वार्ता
माहे जानेवारी 2016

## वसई विरार शहरात राबविण्यात आली श्रमदान मोहिम

माननीय नगरविकास सचिव यांच्या आदेशान्वये, मा. आयुक्त यांनी, सर्व महानगरपालिकेच्या अधिकारी कर्मचा–यांतर्फे दर बुधवारी सायं. ४ ते ६ या कालावधी मध्ये स्वच्छता मोहीम घेण्यात यावी याबाबतचे आदेश असून पारित केले. त्यानुसार बुधवार दि. 27.01.2016 रोजी सदर वसई विरार शहरात स्वच्छता मोहिमेस सुरुवात करणेत आली खालील प्रमाणे "श्रमदान" करून स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ सुरु करण्यात आला.

















# वसई विरार शहर महानगरपालिका



## नागरिकांसाठी आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली

वसई विरार शहर महानगरपालिकेने २६ जानेवारी रोजी सरकारी कार्यालयाशी निगडीत तक्रारींचे निवारण करण्याकरिता आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली कार्यान्वित केली, तरी नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

